# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# व्यवस्थापन परिषदेच्या १३४ वी नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
# गुरुवार, दि.२६ नोव्हेंबर, २०२० दुपारी २:३० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B'Grade (CGPA-2.62)



व्यवस्थापन परिषदेची १३४ वी बैठक गुरुवार, दि.२६ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी २:३० वा. रसायनशास्त्र संकुलातील कॉन्फरन्स हॉलमध्ये मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती :

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | प्रा. डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा - प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ५) | डॉ. वि. ल. कदम | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. र. भि. भोसले | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ८) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| ९) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| १०) | ॲड. श्रीमती नी. सु. मंकणी | सदस्या |
| ११) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १२) | डॉ. ता. ना. कोळेकर | सदस्य |
| १३) | सीए श्रेणीक शहा - प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १४) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १५) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे - कुलसचिव | सदस्य-सचिव |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. प्राचार्य डॉ.शं.कि.पाटील प्र.अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा व डॉ. वि. ल. कदम, अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा.कुलगुरु यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

प्राचार्य डॉ.अ.बा.शिंगाडे, डॉ. श्रीमती सुरैय्या शेख यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. श्री.अ.कि.आवळे, डॉ.एस.सी.मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, डॉ.ध.र.माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ.दि.रा.नंदनवार - प्रभारी सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे, मा.संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि. ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

सदर विषयासंदर्भात सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : १) दि. ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात.

| |
|---|
| • पान क्र. २३ वरील विषय क्र. २२ मधील ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| पूर्वीचा ठराव |
| हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावरुन उत्तर पत्रिका गहाळ प्रकरणी महाविद्यालयास झालेल्या ₹१ लाख दंडाच्या अनुषंगाने पुनर्विचार करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>• अंतर्गत पर्यवेक्षक व बाह्य पर्यवेक्षक यांना प्रत्येकी ₹.१०,०००/- (दहा हजार फक्त) दंड आकारण्यात यावा.<br>• कनिष्ठ पर्यवेक्षक यांना ₹.५,०००/- (पाच हजार फक्त) दंड आकारण्यात यावा.<br>• संबंधित विद्यार्थ्याच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी, प्रकरण प्रमाद समितीकडे सोपविण्यात यावा.<br>• ह्या प्रकारचे गैरप्रकार होणार नाहीत याची महाविद्यालयाने कडक दक्षता घ्यावी. |
| दुरुस्त केलेला ठराव |
| दि.१३ डिसेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन बैठकीतील ठराव क्र.४० (३) मध्ये बदल करुन, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावरुन उत्तर पत्रिका गहाळ प्रकरणी महाविद्यालयास झालेल्या ₹.१ लाख दंडाच्या अनुषंगाने पुनर्विचार करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.<br>• अंतर्गत पर्यवेक्षक व बाह्य पर्यवेक्षक यांना प्रत्येकी ₹.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) दंड आकारण्यात यावा.<br>• कनिष्ठ पर्यवेक्षक यांना ₹.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) दंड आकारण्यात यावा.<br>• संबंधित विद्यार्थ्याच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी, प्रकरण प्रमाद समितीकडे सोपविण्यात यावे.<br>• अशा प्रकारचे गैरप्रकार होणार नाहीत याची महाविद्यालयाने कडक दक्षता घ्यावी. कारण विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका विद्यापीठाकडे जमा करणे ही महाविद्यालयाची जबाबदारी आहे.<br>• महाविद्यालयावर या पूर्वी लावण्यात आलेला ₹.१ लाख दंड माफ करण्यात यावा. |

विषय क्र.२ विद्यापीठ परिसर रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, संगणकशास्त्र संकुल व भूशास्त्र संकुलातील विविध विषयांतर्गत नियमित पूर्णवेळ शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (ङ) अन्वये विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहा पेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांची नावे विद्या परिषदेने शिफारस केलेली असून, त्या नामिकेतून तीन विषय तज्ज्ञांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

प्रस्तुत विद्यापीठच्या परिसरामधील रसायनशास्त्र संकुलातील १) Polymer Chemistry व २) Inorganic Chemistry पदार्थविज्ञान संकुलातील Physics, Applied Electronics and Theoretical Physics संगणकशास्त्र संकुलातील १) Statistics व २) Mathematics व भूशास्त्र संकुलातील १) Geology, २) Environmental Science व ३) Geoinformatics या विषयांच्या नामिकामधून सर्वानुमते खालीलप्रमाणे प्रत्येकी तीन विषय तज्ज्ञांची नामनिर्देशन करण्यात आले.

ठराव : विद्यापीठ परिसर रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, संगणकशास्त्र संकुल व भूशास्त्र संकुलातील विविध विषयांतर्गत नियमित पूर्णवेळ शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (ङ) अन्वये विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या विद्या परिषदेने शिफारस केलेल्या नामिकेतून तीन विषय खालीलप्रमाणे सर्वानुमते तीन तज्ज्ञांचे नामनिर्देशन करण्यात आले.

| Sr.No | Name of the Subject | Names of Expert |
|---|---|---|
| **1)** | **Polymer Chemistry** | **1) Prof. P.P. Mahulkar<br>2) Dr. Ambade Ashootosh<br>3) Prof. Anil Kumar** |
| **2)** | **Inorganic Chemistry** | **1) Prof. (Dr.) Sanjay S. Chavan<br>2) Prof. Dr. Mrs. R.S. Bendre / Prof. Dr. S. S. Kolekar<br>3) Dr. Khan Shabana** |
| **3)** | **Physics, Applied Electronics and Theoretical Physics** | या विषयातील तज्ज्ञांची नावे निश्चित करण्याचे अधिकारी मा.कुलगुरू यांना प्रदान करण्यात आले. |
| **4)** | **Statistics** | **1) Prof. Dr. T.V. Ramnathan<br>2) Prof. S. V. Sabnis<br>3) Prof. Dr. S.B. Munoli** |
| **5)** | **Mathematics** | **1) Prof. Dr. Vilas Kharat<br>2) Prof. Rekha P. Kulkarni<br>3) Prof. Dr. G.S. Khadekar** |
| **6)** | **Geology** | **1) Prof. Dr. Dipak B. Panaskar<br>2) Prof. Dr. Sanjaykumar N. Patil<br>3) Prof. Dr. Deepak B. Malpe** |
| **7)** | **Environmental Science** | **1) Dr. N.N. Bandela<br>2) Prof. S.R. Thorat<br>3) Prof. Dr. J. Narayana** |
| **8)** | **Geoinformatics** | **1) Prof. Dr.Subhash S.S.<br>2) Dr. Parmanand Sharma<br>3) Dr. Ravi Shankar** |

विषय क्र.३ विद्यापीठ परिसर संकुलात सुक्ष्मजीवशास्त्र विभाग (Microbiology Department) सुरु करण्यास मान्यता दिल्याची व सदर अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता (विद्यार्थी संख्या) निश्चित करण्याची बाब विद्या परिषदेने शिफारस केल्यानुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

विद्या परिषदेने शिफारस केल्यानुसार विद्यापीठ परिसर संकुलात सुक्ष्मजीवशास्त्र विभाग (Microbiology Department) सुरु करण्यास मान्यता दिल्याची व सदर अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता (विद्यार्थी संख्या) निश्चित करण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : विद्यापीठ परिसर संकुलात सुक्ष्मजीवशास्त्र विभाग (Microbiology Department) शै. वर्ष २०२०-२१ पासून सुरु करण्यास विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर अभ्यासक्रमाची विद्यार्थी प्रवेश क्षमता (विद्यार्थी संख्या) सर्वानुमते २० (वीस) निश्चित करण्यात आली.

तसेच सदरचा विभाग विद्यापीठातील School of Life Sciences या संकुलाअंतर्गत सुरू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र.४ अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

अधिसभा सदस्यांनी दि.११ डिसेंबर, २०२० रोजी होणाऱ्या बैठकीकरिता विचारलेली प्रश्न व सदर प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ घेऊन सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

ठराव : सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.



### अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. म. बा. देशमुख** | | **प्राचार्य डॉ. ब. पां. रोंगे** |
| १ | How many online seminars PAH University conducted during COVID-१९ period and the number of delegates participated ? | उत्तर सोबत जोडले आहे. |
| २ | What is impact of COVID-१९ on Research publications & the receipt of the project grant ? | COVID-१९ impact cannot be ascertained at this juncture. |
| ३ | What different activities PAH University undertook to combat pandemic COVID-१९ ? | उत्तर सोबत जोडले आहे. |
| **कु. स्व. ज. मोहिते-पाटील** | | **ॲड. श्रीमती नी. सु. मंकणी** |
| १ | आपल्या विद्यापीठात कोणकोणत्या वर्गाच्या परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आल्या आहेत? त्यांचे स्वरुप व गुणदान कशा पध्दतीने करण्यात आले आहे? | प्रस्तुत विद्यापीठामार्फत सर्व अभ्यासक्रमातील सर्व बॅकलॉग व अंतिम वर्षातील अंतिम सत्रातील सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे. बॅकलॉगच्या सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षा या ३५ प्रश्नांच्या व अंतिम वर्षातील अंतिम सत्राच्या परीक्षा या ५० प्रश्नांच्या घेण्यात आल्या आहेत.<br>३५ प्रश्नांच्या परीक्षा सोडविणाऱ्या विद्यार्थ्यांना ७० गुणांमध्ये रुपांतरीत करून निकाल जाहिर करण्यात आला आहे. तसेच प्रथम वर्षाच्या बॅकलॉग विद्यार्थ्यांना ३५ प्रश्नांच्या ४० गुणांमध्ये रुपांतरीत करून निकाल जाहिर करण्यात येतील.<br>तसेच ५० प्रश्नांपैकी ४० प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना ७० गुणांमध्ये रुपांतरीत करून निकाल जाहीर करण्यात आला आहे. |
| २ | ऑन लाईन पध्दतीने परिक्षा घेताना कॉपी केसेस वर नियंत्रण कसे केले आहे? | कॉपी केसेसवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठाने Proctoring पध्दतीचा अवलंब करायचे ठरविले होते, परंतू शासनाकडून मा. कुलगुरुंच्या Online बैठकीमध्ये Proctoring न करण्याबाबत निर्देश आल्याने सदर पध्दतीचा अवलंब केला नाही. ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. |
| ३ | शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग च्या परिक्षेचे नियोजन केले आहे काय? त्या परिक्षा कधी व कोणत्या (ऑनलाईन / ऑफलाईन) होतील? | होय,<br>शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील द्वितीय वर्षाच्या बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० ते ११ ऑक्टोबर, २०२० या कालावधीमध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या आहेत. तर प्रथम वर्षाच्या बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा या दिनांक ६ नोव्हेंबर, २०२० ते ११ नोव्हेंबर, २०२० या कालावधीमध्ये पूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या आहेत. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| **श्री. सु. तु. सरवदे** | | **प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी** |
| १ | विद्यापीठामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे? ते केव्हापासून सेवेमध्ये आहेत व शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांना पगार दिला जातो काय? | प्रस्तुत विद्यापीठामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या १२६ असून ते खाजगी कंत्राटदारामार्फत १२ महिन्यांसाठी सेवेमध्ये आहेत. सदरील कंत्राटी कर्मचाऱ्यांना संबंधित कंत्राटदारामार्फत शासनाच्या धोरणानुसार किमान वेतन देण्यात येते. |
| २ | विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत काय? ऑनलाईन परीक्षेचा ठेका कोणत्या संस्थेला दिला होता? | होय, प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व परीक्षा या सुरळीतपणे पार पडल्या आहेत. सदर ऑनलाईन परीक्षेचा ठेका गोपनीय प्रेसला देण्यात आला होता. |
| ३ | भाषा संकुलातील सुरु केलेल्या विषयाला शासनाची मान्यता आहे काय? | तुर्तास मान्यता नाही; तथापि, यासंदर्भात प्रस्तुत कार्यालयाकडून शेवटचे पत्र जा.क्र.पुअहोसोविसो/आस्था/शिक्षक/२०१९/१८७२ दि.१७ फेब्रुवारी, २०२० अन्वये शासनास अनुदान मान्यतेसाठी स्मरण करुन देण्यात आले आहे.<br>तसेच उपक्त बाबतीत मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी जा.क्र.विससं/उशि/सोवि/विद्यापीठ/२०२०/१०२० दि.१६/०९/२०२० अन्वये शासनास प्रस्ताव अग्रेषित केला आहे.<br>सबब, सद्य:स्थितीत भाषा संकुलातील सुरू केलेल्या विषयांना मान्यता देण्याची बाब शासन स्तरावर प्रलंबित आहे. |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

[५(१)] दि.१२/११/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

दि.१२/११/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समिती बैठकीच्या इतिवृत्तांता संदर्भात,

सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : दि.१२/११/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समिती इतिवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
विषय क्र. ५ मधील ठरावामध्ये अ.क्र.५ चा समावेश करण्यात यावा.
अ.क्र. ५ - प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंट (PMC) यांचे मानधन, प्रत्यक्ष कामाच्या रक्कमेच्या १.५% दराने देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[५(२)] प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र स्थापन करण्यासाठी गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीने तयार केलेला अध्यासन केंद्राचा प्रस्ताव शिक्षण मंत्रालय (पूर्वीचे मनुष्यबळ विकास), मा. सामाजिक न्याय मंत्रालय, भारत सरकार व विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पाठविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

दि. १०/१०/२०२० रोजी विद्या परिषदेने पारित केलेल्या ठरावानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राचा प्रस्ताव शिक्षण मंत्रालय (पूर्वीचे मनुष्यबळ विकास), मा. सामाजिक न्याय मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली व मा. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि मा.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पाठविण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : दि. १०/१०/२०२० रोजी विद्यापरिषदेने पारित केलेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीने तयार केलेला प्रस्ताव खालीलदुरूस्तीसह पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली :

१) मा. सामाजिक न्याय मंत्रालय, भारत सरकार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राचा प्रस्ताव पाठवावा
२) मा. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचा प्रस्ताव पाठवावा.
३) मा.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राचा प्रस्ताव पाठवावा.

[५(३)] श्री. पवार महेश दिगंबर यांचा वाहनचालक या पदाचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झाल्याची व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर या कार्यालयाने त्यांच्या वेतननिश्चितीस मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव व त्यांच्या नियुक्ती आदेशात नमूद केलेली मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेली याचिका क्र. १२३३०/२०१७ ची अट व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

श्री. पवार महेश दिगंबर यांचा वाहनचालक या पदाचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झाल्याची व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर या कार्यालयाने त्यांच्या वेतननिश्चितीस मान्यता दिल्याची बाब अवलोकनी घेऊन त्यांच्या नियुक्ती आदेशात नमूद केलेली मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेली याचिका क्र. १२३३०/२०१७ च्या अटी संदर्भात, खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

- श्री. पवार महेश दिगंबर यांचा वाहनचालक या पदाचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण झाल्याची व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर या कार्यालयाने त्यांच्या वेतननिश्चितीस मान्यतेची नोंद घेण्यात आली. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेली याचिका क्र. १२३३०/२०१७ माघारी घेऊन, श्री. पवार महेश दिगंबर यांच्या नियुक्ती आदेशात नमूद केलेली अट शिथील करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
- श्री. पवार महेश दिगंबर यांच्या वेतन वाढीच्या फरकाची रक्कम मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. शासनाकडून फरकाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधितांना अदा करण्यात यावी.
- शासनाकडून वेतनवाढीच्या फरकाची रक्कम प्राप्त झाली नाही, तर फरकाची रक्कम विद्यापीठ फंडातून देण्यात येणार नाही असे करारपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

[५(४)] **विद्यापीठ, संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णया विरूध्दच्या अपिलांवर सुनावणी करण्याकरीता लोकपाल नियुक्ती बाबत शोध समितीचे नामनिर्देशन करून मिळण्याबाबत कार्यवाही करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७चा महा.६) यांच्य कलम ५६ च्या पोट कलम (२) चा खंड (ख) अणि कलम (११) तसेच कलम (१०) यांव्दारे तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - नुसार विद्यापीठ, संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णया विरूध्दच्या अपिलांवर सुनावणी करण्याकरीता लोकपाल नियुक्ती करण्यासाठी शोध समिती स्थापन करणेसाठी २०१९ चा परिनियम च्या कलम ६ (५) अन्वये पुढील प्रमाणे शोध समितीतील अ.क्र. १ व २ च्या नामनिर्देशन करून मिळणे व त्यानुसार राजभवन व महाराष्ट्र शासनास पत्रव्यवहार करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **विद्यापीठ, संस्थात्मक तक्रार निवारण कक्षाच्या किंवा विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाच्या निर्णया विरूध्दच्या अपिलांवर सुनावणी करण्याकरीता लोकपाल नियुक्ती बाबत शोध समितीचे नामनिर्देन करण्यासाठी मा. राजभवन व महाराष्ट्र शासन यांना पत्रव्यवहार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[५(५)] प्रस्तुत विद्यापीठामार्फत चालविल्या जाणाऱ्या बहि:स्थ अभ्यासक्रम विभागास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसल्याने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सर्व अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याची व यापूर्वी प्रवेशित असणाऱ्या सर्वांचे अभ्यासक्रम (N+२) कालावधी पूर्ण होईपर्यंत चालू ठेवण्याची विद्या परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

प्रस्तुत विद्यापीठामार्फत चालविल्या जाणाऱ्या बहि:स्थ अभ्यासक्रम विभागास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसल्याने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सर्व अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याची व यापूर्वी प्रवेशित असणाऱ्या सर्वांचे अभ्यासक्रम (N+२) कालावधी पूर्ण होईपर्यंत चालू ठेवण्याची विद्या परिषदेने केलेली, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : प्रस्तुत विद्यापीठामार्फत चालविल्या जाणाऱ्या बहि:स्थ अभ्यासक्रम विभागास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसल्याने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सर्व अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याची व यापूर्वी प्रवेशित असणाऱ्या सर्वांचे अभ्यासक्रम (N+२) कालावधी पूर्ण होईपर्यंत चालू ठेवण्याची विद्या परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[५(६)] विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्रास कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे असे नामाभिधान करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रास कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे असे नामाभिधान करण्यासंदर्भात चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्र तसेच विद्यापीठातील इतर केंद्र यांचे नामाभिधान करण्यासंदर्भात मा.कुलगुरू नामनिर्देशीत समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

सदर समिती नामाभिधान करण्यासंदर्भात नियमावली तयार करुन आगामी बैठकीत सादर करतील असेही ठरले.

[५(७)] बँक ऑफ इंडियाचे कार्पोरेट इंटरनेट बँकींगद्वारे देयक ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी डॉ. एस. एन. शिंदे, सहायक कुलसचिव यांचा ॲप्रुव्हर चा रोल Deactivate करणे व त्यांच्याऐवजी टिपणीतील तक्ता १ व २ नुसार अधिकारी व कर्मचारी यांना नव्याने डेटा एन्ट्री ऑपरेटर (मेकर) व ॲप्रुव्हर चे रोल देणे व समान लेखा संहितेत अपेंडिक्स २ मध्ये नमूद अधिकारामध्ये वाढ करुन प्रदान करण्याची बाब विचारार्थ.

बँक ऑफ इंडियाचे कार्पोरेट इंटरनेट बँकींगद्वारे देयक ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी डेटा एन्ट्री ऑपरेटर (मेकर) व ॲप्रुव्हर चे रोल देणे व समान लेखा संहिता मधील APPENDIX-II SIGNING OF CHEQUES नुसार अधिकार प्रदान करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : बँक ऑफ इंडियाचे कार्पोरेट इंटरनेट बँकींगद्वारे देयक ऑनलाईन पध्दतीने अदा करण्यासाठी ॲप्रुव्हर चे रोल देणे व समान लेखा संहिता मधील APPENDIX-II SIGNING OF CHEQUES मध्ये खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | |
|---|---|
| **Assistant Section Officer** | **Upto Rs.5,000/-** |
| **Accountant** | **Upto Rs.50,000/-** |
| **Finance and Accounts Officer** | **Above Rs.50,000/-** |

[५(८)] प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग २ च्या कक्ष अधिकारी या रिक्त असलेल्या पदावर पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव.

प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग २ च्या कक्ष अधिकारी या पदावर रिक्त असलेल्या पदावर पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची नोंद घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : प्रस्तुत विद्यापीठातील वर्ग २ च्या कक्ष अधिकारी या रिक्त असलेल्या पदावर नियमानुसार पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची नोंद घेण्यात आली.

[५(९)] **विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय सहाय्यता निधी योजने अंतर्गत सुविधा देण्यासाठी विविध हॉस्पिटल्स सोबत करार करण्याची बाब विचारार्थ.**

विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय सहाय्यता निधी योजने अंतर्गत Cashless सुविधा देण्यासाठी खालील तक्त्यात नमूद सर्व हॉस्पिटल्स सोबत Memorandum of Understanding (MoU) करण्यासंदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| अ. क्र. | रुग्णालयाचे नाव |
|---|---|
| १ | अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र सोलापूर |
| २ | कोठडिया नर्सिंग होम सोलापूर |
| ३ | एस एस बलदवा न्युरोसायन्सेस एंड वुमेन केअर हॉस्पिटल सोलापूर |
| ४ | यशोधरा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रा.लि. सोलापूर |
| ५ | चंदन न्युरोसायन्सेस (सी.एन.एस.) हॉस्पिटल सोलापूर |
| ६ | गंगामाई हॉस्पिटल सोलापूर |
| ७ | आदर्श आय एंड ऑर्थपेडीक हॉस्पिटल सोलापूर |
| ८ | स्पर्श न्युरो एंड स्पेशालिटी हॉस्पिटल सोलापूर |

ठराव : **विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय सहाय्यता निधी योजने अंतर्गत सुविधा देण्यासाठी विविध हॉस्पिटल्स सोबत Memorandum of Understanding (MoU) च्या मसुद्यात सुधारणा करुन, पुनश्च आगामी बैठकीत सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

सही/-
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद